# फ्लिपकार्टने २३००० नव्या कर्मचाऱ्यांसह पुरवठा साखळीला दिली बळकटी

*देशभरातील ई-कॉमर्स सेवेच्या वाढत्या मागण्या पूर्ण करण्यासाठी नव्या नियुक्त्या, यातून रोजगार आणि उत्पन्न निर्मितीही*

**बंगळुरु - २५ मे २०२१ :** फ्लिपकार्ट या भारतातील एतद्देशीय ई-कामॅर्स बाजारपेठेने देशाच्या कानाकोपऱ्यात सुरक्षित पद्धतीने विविध प्रकारची उत्पादने डिलिव्हर करण्यासाठी आपल्या पुरवठा साखळीला सातत्याने बळकटी देत या पुरवठा साखळीत अतिरिक्त रोजगारनिनिर्मितीही कायम ठेवली आहे. मागील तीन महिन्यात म्हणजे मार्च ते मे २०२१ या काळात फ्लिपकार्टने पुरवठा साखळीतील विविध जबाबदाऱ्यांसाठी देशभरात २३००० लोकांना सेवेत घेतले आहे. यात डिलिव्हरी एक्झिक्युटिव्ह्सचाही समावेश आहे.

"*फ्लिपकार्टमध्ये आमच्यासाठी सर्वाधिक प्राधान्यक्रमाची बाब म्हणजे ग्राहकांच्या गरजा सुरक्षित आणि दमदार पुरवठा साखळीच्या माध्यमातून पूर्ण करणे आणि त्याचवेळी आमच्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेची खातरजमा करणे. देशभरात नागरिक कोरोनाशी लढा देण्यासाठी अजूनही घरीच असल्याने ई-कॉमर्स सेवेची मागणी वाढत आहे. यातून हजारो रोजगारसंधीही निर्माण होत आहेत. या आव्हानात्मक काळात सर्व नव्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेची खातरजमा करण्यासाठी आमच्या हेल्थकेअर आणि वेलनेस उपक्रमात त्यांचा समावेश केला जाईल.*" - ***हेमंत बद्री, वरिष्ठ उपाध्यक्ष, पुरवठा साखळी, फ्लिपकार्ट***

कोविड-१९ च्या या संकटात फ्लिपकार्टसाठी त्यांचे कर्मचारी, ग्राहक, विक्रेते आणि परिसंस्था भागीदारांची सुरक्षा हा प्राधान्यक्रम आहे. त्यांच्या सर्व गोदामांमध्ये सुरक्षेचे कडक नियम आणि निर्बंध पाळून कोविड सुरक्षित वर्तनाबद्दल जागरुकता केली जाते. तसेच कंपनीतर्फे पुरवठा साखळीच्या विविध पातळ्यांवर थेट नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमही घेतले जातात.

वर्गातील शिक्षण आणि डिजिटल प्रशिक्षणासोबतच कर्मचाऱ्यांमध्ये पुरवठा साखळी व्यवस्थापनाबद्दल अधिक चांगली समज निर्माण करण्यासाठी व्हॉट्सअ‍ॅप, झूम आणि हँगआऊट अशा मोबाइल अ‍ॅप्लिकेशन्सच्या माध्यमातून तसेच फ्लिपकार्टच्या लर्निंग मॅनेजमेंट सिस्टम (एलएमएस)च्या माध्यमातून हे प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षण सत्रांमध्ये ग्राहकसेवा, डिलिव्हरी, इन्स्टॉलेशन आणि सेफ्टी तसेच स्वच्छतेच्या उपाययोजना त्याचबरोबर हँड-हेल्ड डिव्हाईसेस, पीओएस मशिन्स, स्कॅनर्स, विविध मोबाइल अ‍ॅप्लिकेशन्स आणि ईआरपीज यांचा समावेश असतो. त्यांना कोविड-१९चे प्रोटोकॉल, सुरक्षा नियम यांसंदर्भात माहिती आणि प्रशिक्षण देऊन त्यांच्या आणि ग्राहकांच्या सुरक्षिततेची खातरजमा केली जाते.

## About Flipkart

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and Flipkart Wholesale. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants, and small businesses to be a part of India's e-commerce revolution, with a registered customer base of over 300 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize e-commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs have inspired us to innovate on many industry firsts. The recent launch of Flipkart Wholesale, our new digital marketplace, is a testament to our commitment to accelerate the growth of kiranas and MSMEs in India. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market, and now Flipkart Wholesale, the Flipkart Group will continue to steer the transformation of commerce in India through technology.

For more information, please contact media@flipkart.com